इयत्ता १० वी च्या परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवून
इ.११ वी मध्ये प्रवेश घेतलेल्या व १२ वी मध्ये शिकणाऱ्या
विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास
प्रवर्गाच्या मुला-मुलींना राजर्षी छत्रपती शाहू महाराज
गुणवत्ता शिष्यवृत्ती प्रदान करणे

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक -इमाव २००३/प्र.क्र.२०४/मावक-३
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
**दिनांक: २५ जूलै, २००३**

**प्रस्तावना:-** विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा सुधारावा व त्यांच्या गुणवत्तेमध्ये वाढ व्हावी तसेच सर्वसाधारण विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक स्पर्धेमध्ये ते टिकून राहावेत यासाठी गुणवंत विद्यार्थ्यांना सक्षम करण्यासाठी इयत्ता १० वी मध्ये ७५ % व त्यापेक्षा जास्त गुण मिळवून इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घेणा-या अनुसूचित जातीच्या मुला/मुलींसाठी सन २००३-०४ या शैक्षणिक वर्षापासून राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना लागू केलेली आहे. त्याबाबतचा शासन निर्णय क्रमांक **इबीसी-२००३/प्र.क्र.११५/मावक-२, दिनांक ११ जून, २००३** ची प्रत सोबत जोडली आहे. त्याच धर्तीवर सदरहू योजना विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या मुला-मुलींना लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-** याबाबत साकल्याने विचार करुन इयत्ता १० वी मध्ये ७५ % व त्यापेक्षा जास्त गुण मिळवून इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घेणा-या व इ. १२ मध्ये शिकणाऱ्या विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या मुला/मुलींसाठी सन २००३-०४ या शैक्षणिक वर्षापासून राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती ही योजना अनुसूचित जातीकरीता असलेल्या शिष्यवृत्ती योजनेच्या धर्तीवर लागू करण्यास शासन मान्यता देत आहे.

२. सदर गुणवत्ता शिष्यवृत्तीकरीता येणारा खर्च तातडीची गरज म्हणून आकस्मिकता निधीमधून अग्रिम म्हणून रु. ६३,००,०००.०० (रुपये त्रेसष्ठ लाख फक्त ) शासन ज्ञापन वित्त विभाग क्रमांक आकनि-११०३/३९/अर्थसंकल्प-५, दिनांक २२.७.२००३ (संगणक संकेतांक क्रमांक: ८०००-०३९-१ )अन्वये आकस्मिकता निधीतून मंजूर करण्यात येत आहे. हा क्रमांक खर्चाच्या देयकावर तांबडया शाईने लिहून अधोरेखित करावा. याबाबतचे विवरणपत्र वित्त विभाग तसेच सह संचालक, लेखा व कोषागरे, मुंबई यांना पाठवावे.

३. या बाबीवर होणारा खर्च " २२२५,अनु.जाती,अनु.जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण ०३-मागासवर्गीयांचे कल्याण २७७ शिक्षण ,पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (राज्य योजनांतर्गत योजना) (०२)(३५) इयत्ता १० वी च्या परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवून इ.११ वी मध्ये प्रवेश घेतलेल्या व १२ वी मध्ये शिकत असलेल्या विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या मुला-मुलींना राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती प्रदान करणे (२२२५ ३१९ १) ४०-शिष्यवृत्ती/विद्यावेतने-मागणी क्रमांक एन - ४ " या लेखाशीर्षाखाली खर्ची घालण्यात यावा.

४. यासाठी संचालक, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक:- ६११/०३/व्यय-१४ , दिनांक १६/७/२००३ व क्रमांक: ७५/अर्थोपाय/२००३ दिनांक २५.७.२००३ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.



( वै.अ.पारकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति
मा. राज्यपालांचे सचिव,
मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव,
मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव
प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई
सचिव ,शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
सर्व मंत्रालयीन विभाग
संचालक, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, लेखा व कोषागरे, मुंबई
वित्त विभाग (व्यय १४/अर्थोपाय/अर्थ संकल्प-३),मंत्रालय, मुंबई ३२
उपसंचालक, शिक्षण, सर्व विभाग.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व विभागीय समाज कल्याण अधिकारी
सर्व विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी
त्यांना कळविण्यात येते की, सदर शासन निर्णयाची प्रत त्यांच्या जिल्हयातील सर्व कनिष्ठ महाविदयालये / वरिष्ठ महाविदयालये यांना त्यांच्या स्तरावरुन निर्गमित करावी.
सर्व शिक्षणाधिकारी (उच्च माध्यमिक)
त्यांना कळविण्यात येते की, सदर शासन निर्णयाची प्रत त्यांच्या जिल्हयातील सर्व कनिष्ठ महाविदयालये / वरिष्ठ महाविदयालये यांना त्यांच्या स्तरावरुन निर्गमित करावी.
महालेखापाल, महाराष्ट्र - १/२ ( लेखा परीक्षा, लेखा अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
सर्व कोषागार अधिकारी.
सर्व उप सचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी, सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग
निवड नस्ती , मावक - ३